वाचले

१) परिपत्रक क्र.नासुकें/१/कावि/३४५/२०१७ दि.२२/०९/२०१७

२) परिपत्रक क्र.नासुकें/१/कावि/८२/२०१८ दि.०३/०३/२०१८

३) परिपत्रक क्र.नासुकें/१/कावि/४५२/२०१९ दि.२२/०४/२०१९

४) परिपत्रक क्र.नासुकें/१/कावि/८६५/२०१९ दि.०५/०५/२०१९

५) परिपत्रक क्र.नासुकें/१/कावि/७५/२०२१ दि.०३/०३/२०२१

६) परिपत्रक क्र.नासुकें/१/कावि/८८/२०२१ दि.११/०३/२०२१

७) परिपत्रक क्र.नासुकें/१/कावि/८५/२०२१ दि.१०/०३/२०२१

८) परिपत्रक क्र.नासुकें/१/कावि/९१/२०२१ दि.१५/०३/२०२१

९) आदेश क्र.नासुकें/१/कावि/११५/२०२१ दि.०१/०४/२०२१

१०) परिपत्रक क्र.नासुकें/१/कावि/२७६/२०२० दि.१८/१२/२०२०

११) परिपत्रक क्र.नासुकें/१/कावि/७६/२०२१ दि.०३/०३/२०२१

१२) परिपत्रक क्र.नासुकें/१/कावि/०९/२०१९ दि.०५/०१/२०१९

१३) परिपत्रक क्र.नासुकें/१/कावि/६०५/२०१९ दि.०६/०६/२०१९

१४) मा.आयुक्त सो यांनी मान्य केलेला दि. १६/०६/२०२१ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

माहितीचा अधिकार

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.
नागरी सुविधा केंद्र.
क्र.नासुकें/१/कावि/१६० /२०२१
दिनांक : १६ /०६/२०२१

**विषय :- <u>माहिती अधिकार अधिनियम, २००५ मासिक व वार्षिक अहवालाबाबत व मनपा माहिती अधिकार संगणक प्रणालीबाबत</u>.....**

## आदेश

सन २००५ पासून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कायदा लागू करणेत आलेला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६(१) नुसार ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची सुविधा दि.२१ ऑगस्ट २०१४ पासून नागरिकांसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच, विभागांमध्ये हार्ड कॉपी स्वरुपात प्राप्त होणारे अर्ज संबंधित विभागांनी तात्काळ ऑनलाईन नोंदवून घेणेबाबत व ऑनलाईन RTI संगणक प्रणालीचा वापर करणेसंबंधी सर्व विभागांना उपरोक्त वाचले क्र.१ ते ६ अन्वये वारंवार आदेश/परिपत्रके व पत्रव्यवहार करुन कळविले आहे.

मा.आयुक्त सो यांचेकडील उपरोक्त वाचले क्र.१ चे परिपत्रकान्वये सर्व विभागांना माहिती अधिकारांतर्गत प्राप्त होणारे सर्व माहिती अर्ज ऑनलाईन संगणक प्रणालीव्दारेच नोंदविणे व मासिक अहवाल हार्ड कॉपी अथवा सॉफ्ट कॉपी मध्ये नागरी सुविधा केंद्र विभागाच्या cfc@pcmcindia.gov.in या ई-मेलवर **दरमहा ५ तारखेला दुपारी ३ वाजेपर्यंत** पाठविणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

तथापि, मनपा ऑनलाईन RTI ची तपासणी केली असता बरेच विभाग माहिती अधिकार अर्जाची ऑनलाईन स्वरुपात नोंद घेत नसलेचे निदर्शनास आले आहे. तसेच, मनपाच्या अनेक विभागांकडून दरमहा मासिक अहवाल प्राप्त होत नाही. माहे जानेवारी-२०२१ मध्ये अनेक विभागांनी मासिक अहवाल पाठविला नसलेने उपरोक्त वाचले क्र.५ व वाचले क्र.६ चे परिपत्रकान्वये मनपाच्या सर्व विभागांना माहिती अधिकार मासिक अहवाल **<u>दरमहा ५ तारखेला दुपारी ३ वाजेपर्यंत</u>** हार्ड कॉपी अथवा सॉफ्ट कॉपी व्दारे नागरी सुविधा केंद्र विभागाकडे पाठविणेबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

तदनंतर देखील बहुतांश विभागांनी माहिती अधिकार **माहे मे-२०२१** चा मासिक अहवाल पाठविलेला नाही. यावरुन संबंधितांना माहिती अधिकार कायद्याचे गांभीर्य नसलेचे निदर्शनास येत आहे. सदर बाब

...२

Scanned with CamScanner

नियमाधीन नाही. दरमहा शासनास विहित वेळेत मासिक अहवाल पाठविणे क्रमप्राप्त असून मनपाच्या सर्व विभागांकडून मासिक अहवाल वेळचे वेळी प्राप्त होत नसलेने शासनास अपूर्ण माहिती पाठवावी लागत आहे.

तसेच, उपरोक्त वाचले क्र.८ व ९ अन्वये खालील नमूद विभागांना त्यांचे अंतर्गत असलेल्या उपविभागांचा व त्यांच्या मुख्य कार्यालयाचा <u>एकत्रित मासिक अहवाल</u> दरमहा नागरी सुविधा केंद्र विभागाकडे पाठविणेबाबत आदेश निर्गमित करणेत आलेले आहेत.

१) करसंकलन विभाग
२) पाणीपुरवठा विभाग
३) जलनि:सारण विभाग
४) स्थापत्य विभाग
५) विद्युत विभाग
६) वैद्यकीय विभाग
७) शिक्षण विभाग
८) माध्यमिक शिक्षण विभाग
९) आरोग्य विभाग
१०) भूमि आणि जिंदगी विभाग
११) बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग

तथापि, उपरोक्त विभागांपैकी करसंकलन व वैद्यकीय मुख्य कार्यालय वगळता इतर विभाग सदर आदेशाचे पालन करीत नसलेचे माझे निदर्शनास आले आहे. यावरुन आपले विभागाचा व उपविभागांचा एकत्रित अहवाल न पाठविणारे व उपरोक्त मासिक अहवाल विहित वेळेत सादर न करणाऱ्या विभागांना/संबंधितांना सदर विषयाबाबत गांभीर्य नसलेचे निदर्शनास येत आहे.

तसेच, सद्यस्थितीत कोरोना विषाणूच्या वाढत्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमिवर शासनाकडील प्राप्त निर्देशानुसार माहिती अधिकारात प्राप्त झालेले अपिल सुनावणीकामी अर्जदारास कार्यालयात न बोलावता सदरचे अपिल व्हिडीओ कॉन्फरन्सव्दारे घेणेबाबत उपरोक्त वाचले क्र.१० चे परिपत्रकान्वये मनपाच्या सर्व विभागांना कळविणेत आले आहे. तरी देखील अपिले ही व्हिडीओ कॉन्फरन्सव्दारे घेणेत येत नसलेबाबत काही अर्जदारांनी ई-मेलव्दारे/दूरध्वनीव्दारे तक्रारी केलेल्या आहेत.

शासनाकडील आपले सरकार ऑनलाईन संगणक प्रणालीमध्ये अनेक मुदतबाह्य प्रकरणे प्रलंबित असलेने उपरोक्त वाचले क्र.१३ चे परिपत्रकान्वये प्रलंबित प्रकरणांवर विहित वेळेत कार्यवाही करुन सदर प्रकरणे ऑनलाईन संगणक प्रणालीमधून निरस्त करणेबाबत निर्देश देणेत आलेले आहेत. तथापि, आपले सरकार ऑनलाईन संगणक प्रणालीची तपासणी केली असता अनेक मुदतबाह्य प्रकरणे प्रलंबित दिसत आहेत.

**सबब, मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या आदेशान्वये** माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची प्रभावी अंमलबजावणी होणेचे दृष्टीने मनपाच्या सर्व विभागप्रमुख/प्रथम अपिलीय अधिकारी/जनमाहिती अधिकारी/माहिती अधिकार संबंधी काम करणाऱ्या सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांना आदेशित करीत आहे की, त्यांनी खालील प्रमाणे तातडीने कार्यवाही करावी.

- प्रत्येक विभागाचे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या प्रशासकीय बदलीमुळे अथवा निवृत्तीमुळे होणारे बदल वेळचे वेळी नागरी सुविधा केंद्र विभागास अवगत करावे.
- प्रत्येक विभागाने जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे नावाचा फलक विभागाचे दर्शनी भागावर प्रसिद्ध करावा.
- माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४(१)(ख) मधील १७ मुद्यांची माहिती अद्ययावत नाही ती त्वरीत अद्ययावत करुन मनपाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी.
- दर सोमवारी दुपारी ३ ते ५ या वेळेत नागरिकांसाठी अभिलेखे उपलब्ध करुन द्यावेत. (वाचले क्र.१२)
- माहे मे-२०२१ अखेर पर्यंत माहिती अधिकारातील प्रकरणे व अपिलात गेलेली प्रकरणे मोठ्या प्रमाणामध्ये प्रलंबित दिसून येत आहेत. सदर ऑनलाईन व ऑफलाईन प्रकरणांवर लवकरात लवकर कार्यवाही करुन सदर प्रकरणे निकाली काढणेत यावीत.
- माहिती अधिकार अपिलांची संख्या मर्यादित राहण्याच्या दृष्टीने माहिती अधिकारात अर्जदाराने मागितलेली माहिती विहित मुदतीत व योग्य स्वरुपात उपलब्ध करुन द्यावी.
- महानगरपालिकेने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्ज स्विकृतीकामी संगणक प्रणाली विकसित करुन देखील लेखी स्वरुपातील अर्जांची नोंद या संगणक प्रणाली मध्ये घेतली जात नसलेचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे त्या-त्या विभागाने त्वरीत सदर लेखी स्वरुपात प्राप्त झालेले माहिती अर्ज माहिती अधिकार संगणक प्रणालीमध्ये नोंदविणे आवश्यक आहे. लेखी स्वरुपातील

...३

Scanned with CamScanner

अर्जांची नोंद संगणक प्रणाली मध्ये घेतली नसल्यास संबंधित जनमाहिती अधिकारी/संबंधित विभागप्रमुखांना जबाबदार धरणेत येईल याची नोंद घ्यावी.

- माहिती अधिकारातील अर्ज/प्रथम अपील अर्ज अर्जातील अपूर्ण पदनाम अथवा इतर विभागाशी संबंधित असणे इ. कारणास्तव न नाकारता तो स्विकारुन आवश्यकतेनुसार माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(३) अन्वये योग्य त्या जन माहिती अधिकाऱ्याकडे विहित मुदतीत वर्ग करणेबाबत दक्षता घ्यावी.
- शासनाकडील आपले सरकार ऑनलाईन माहिती अधिकार संगणक प्रणालीचे लॉग इन आय डी व पासवर्ड यापूर्वीच मनपाच्या सर्व विभागांना उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. शासनाकडील आपले सरकार ऑनलाईन माहिती अधिकार संगणक प्रणालीमधील प्रकरणांवर विहित वेळेत कार्यवाही करुन सदर प्रकरणे वेळचे वेळी ऑनलाईन संगणक प्रणालीमधून निरस्त करणेत यावीत. याबाबत काही अडचण उद्भवल्यास नागरी सुविधा केंद्र विभागाशी समन्वय साधावा.
- शासन परिपत्रकात माहिती अधिकार नोंदवह्यांचे (माहिती अधिकार अर्जांची व अपिल अर्जांची) दिलेल्या नमुन्यांप्रमाणे मासिक अहवालासह नोंदवह्या अद्ययावत ठेवणेत याव्यात. सोबत उपरोक्त नोंदवह्यांचे नमुने ई-मेलवर पाठविणेत येत आहेत. (वाचले क्र.४)
- माहिती व तंत्रज्ञान विभागाने उपरोक्त संगणक प्रणालीमधील त्रुटी तात्काळ दूर करुन अपील अर्ज देखील संगणक प्रणालीव्दारे करण्याची सुविधा विभागांना व नागरिकांना उपलब्ध करुन द्यावी.
- आपले विभागाचे प्रथम अपिलीय अधिकारी, जनमाहिती अधिकारी व माहिती अधिकाराचे प्रत्यक्ष काम करणारे अधिकारी / कर्मचारी यांची माहिती सोबत दिलेल्या प्रपत्र अ, ब व क मध्ये भरुन तात्काळ नागरी सुविधा केंद्र विभागाच्या rti@pcmcindia.gov.in या ई-मेलवर सॉफ्ट कॉपी स्वरुपात पाठविण्यात यावी.
- माहिती अधिकार मासिक अहवाल दरमहा शासनास पाठविणे क्रमप्राप्त असून मनपाच्या सर्व विभागांनी आपल्या विभागाचा माहिती अधिकार अर्जांचा व अपिल अर्जांचा मासिक अहवाल <u>दरमहा ५ तारखेच्या दुपारी ३ वाजेपर्यंत</u> हार्ड कॉपी स्वरुपात अथवा नागरी सुविधा केंद्र विभागाच्या rti@pcmcindia.gov.in या ई-मेलवर सॉफ्ट कॉपी स्वरुपात पाठवावा. यापुढे ज्या विभागांचा मासिक अहवाल विहित वेळेत प्राप्त होणार नाही अशा संबंधित जनमाहिती अधिकाऱ्यास/विभागप्रमुखांस जबाबदार धरणेत येईल याची संबंधितांनी गांभिर्याने नोंद घ्यावी.
- ज्या विभागांना त्यांचे उपविभागांचा व त्यांचे मुख्य कार्यालयाचा एकत्रित अहवाल नागरी सुविधा केंद्र विभागास सादर करणेकामी आदेश देणेत आलेले आहेत त्यांनी आपले अखत्यारितीत असलेल्या उपविभागांचा व त्यांचे मुख्य कार्यालयाचा अहवाल एकत्रित करुन <u>दरमहा ५ तारखेच्या दुपारी ३ वाजेपर्यंत</u> नागरी सुविधा केंद्र विभागास सादर करावा. (वाचले क्र.८ व ९)
- सद्यस्थितीत कोरोनाच्या पार्श्वभूमिवर शासनाकडील प्राप्त निर्देशानुसार माहिती अधिकारात प्राप्त झालेले अपिल अर्जांवर सुनावणीकामी अर्जदारास कार्यालयात न बोलावता सदरचे अपिल व्हिडीओ कॉन्फरन्सव्दारे घेणेत यावेत. सोबत शासनाकडील संबंधित परिपत्रक व मनपा आदेश जोडणेत आलेला आहे. (वाचले क्र.१०)
- उपरोक्त बाबीं सदर्भात काही अडचण उद्भवल्यास नागरी सुविधा केंद्र विभागाशी अथवा संगणक प्रणालीतील अडचणींसाठी माहिती व तंत्रज्ञान विभागाशी संपर्क साधणेत यावा.
- उपरोक्त प्रमाणे माहिती अधिकार अधिनियम, २००५ कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होणेचे दृष्टीने विभागप्रमुखांनी आपले स्तरावर अधिकारी/कर्मचाऱ्यांची स्वतंत्र बैठक घेऊन संबंधितांना तसे आदेश द्यावेत.

उपरोक्त बाबींचे काटेकोरपणे पालन करावे. अन्यथा संबंधितांवर नियमाधीन कारवाई प्रस्तावित करणेत येईल याची सर्व संबंधितांनी स्पष्ट नोंद घ्यावी.

१८/०८/२१

(राजेश पाटील)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

प्रति,

सर्व संबंधित.

------------------ विभाग.

Scanned with CamScanner

## माहिती अधिकारांतर्गत विभागामध्ये लावावयाच्या बोर्डाचा नमुना

**(अधिका-याचे नाव)**

**................ अधिकारी तथा प्रथम अपिलीय अधिकारी,**

**......................................... विभाग**

**(अधिका-याचे नाव)**

**................ अधिकारी तथा जनमाहिती अधिकारी,**

**......................................... विभाग**

Scanned with CamScanner

अत्यंत तातडीचे

माहितीचा अधिकार

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.
नागरी सुविधा केंद्र.
क्र.नासुकें/१/कावि/८५/२०२१
दिनांक :- १०/०३/२०२१

विषय :- माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ मधील तरतुदींच्या अंमलबजावणीबाबत...

परिपत्रक

शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१५/प्र.क्र.(२५२/१५) सहा. दि.२८/०१/२०१६ अन्वये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ४(१)(क) मधील तरतुदींनुसार माहितीचा अधिकार मिळणे सोईचे होईल अशा रितीने आणि स्वरुपात अभिलेखे सुचिवद्ध करणे, त्याची निर्देशसूची तयार करणे आणि त्याचे संगणकीकरण करणे योग्य आहे अशा अभिलेख्याचे संगणकीकरण करणे व ते देशातील विविध प्रणालींमध्ये नेटवर्कमार्फत जोडणे आवश्यक असून अधिनियमातील कलम ४(१)(ख) मध्ये दर्शविलेल्या १७ वावींवरील माहिती सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी तयार करुन ती प्रसिद्ध करणे अनिवार्य असलेवावत कळविले होते.

तसेच, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अर्जदारांना माहिती उपलब्ध होण्याच्या दृष्टीने दरवर्षी किमान दोन वेळा आणि अधिकारी संदर्भातील जसे वदल्यांविषयक माहिती वेळोवेळी अद्ययावत करणेबाबत सदर शासन परिपत्रकान्वये कळविण्यात आले आहे होते. त्यानुसार मनपाच्या सर्व विभागांना वारंवार परिपत्रकान्वये सूचित करण्यात आले आहे.

शासन परिपत्रक क्र.संकिर्ण-२०२१/प्र.क्र.१५/नवि-२० दि.२१/०१/२०२१ अन्वये शासनाकडून शासनाच्या विविध विभाग / कार्यालयात portals, applications, software वगैरे स्वरुपात उपलब्ध असलेली सार्वजनिक स्वरुपाची माहिती प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने त्यांचे वेवपोर्टलवर प्रसिद्ध करुन त्यामध्ये वेळोवेळी होणारे वदल अद्ययावत करणेवावत कळविले आहे.

मा.विभागीय आयुक्त, विधानभवन पुणे यांचेकडील क्र.नपाप्र/नपा-४/कावि/१७८/२०२१ दि.२५/०२/२०२१ अन्वये उपरोक्तप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५ प्रमाणे आवश्यक माहिती मनपा संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेबावत कळविणेत आले आहे.

सबब, या परिपत्रकान्वये सर्व विभागप्रमुख / प्रथम अपिलीय अधिकारी / जन माहिती अधिकारी व संवंधितांना सूचित करण्यात येते की, अर्जदारांना माहिती उपलब्ध होण्याच्या दृष्टीने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ४(१)(ख) मध्ये दर्शविलेल्या १७ वावींवरील आपल्या विभागाची माहिती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर अद्ययावत करणेत येऊन सोबत पाठविलेल्या शासनाकडील परिपत्रकान्वये व विभागीय आयुक्त कार्यालयाकडील पत्रान्वये कार्यवाही करणेत यावी.

...२

Scanned with CamScanner

तसेच, दरवर्षी किमान दोन वेळा म्हणजेच दिनांक १ जानेवारी व दिनांक १ जुलै रोजी असे वर्षातून किमान दोन वेळा व अधिकारी संदर्भातील जसे बदल्यांविषयक व इतर कामकाज वाटपामुळे झालेल्या बदलांबाबतची माहिती वेळोवेळी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर (www.pcmcindia.gov.in) अद्ययावत करावी. याबाबत तांत्रिक अडचणी उद्भवल्यास माहिती व तंत्रज्ञान विभागाशी तातडीने संपर्क साधून निराकरण करावे.

(राजेश पाटील)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

प्रति,

सर्व विभागप्रमुख,

------------------------------------------- विभाग

सोबत :- शासनाकडील परिपत्रक व विभागीय आयुक्त कार्यालयाकडील पत्र.

प्रत :- माहिती व तंत्रज्ञान विभाग

२/- माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ४(१)(ख) नुसार मनपाच्या विभागांकडून १ ते १७ बाबी अद्ययावत केलेल्या विभागांची व अद्ययावत न करणाऱ्या विभागांची यादी उलट टपाली पाठविणेत यावी.

Scanned with CamScanner

**केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 4(1) (ख) मधील १ ते १७ बाबी जनतेस स्वयंप्रेरणेने प्रसिद्ध करावयाची नियम पुस्तिका (मॅन्यूअल)**

| | |
|---|---|
| 1 | कार्यालयाचा तपशिल,कामकाज आणि कर्तव्ये |
| 2 | कार्यालयाचे अधिकारी आणि कर्मचारी यांचे अधिकार आणि कर्तव्ये |
| 3 | निर्णय प्रक्रियेसाठी अनुसरली जाणारी पद्धत पर्यवेक्षण आणि जबाबदारी |
| 4 | कामकाज पूर्तता करण्यासाठी विहित केलेले निकष |
| 5 | कामकाज कार्यवाही करण्यासाठी कर्मचा-यांकडून वापरण्यात येणारे नियम,अटी,निर्देश,नियमावली आणि अभिलेख |
| 6 | उपलब्ध असलेल्या अथवा अधिपत्याखाली असलेल्या दस्तऐवजाच्या (अभिलेखाच्या) वर्गवारीची यादी |
| 7 | धोरणात्मक बाबी निश्चित करण्यासाठी अथवा त्यांची अंमलबजावणी करण्यासंबंधात जनतेच्या प्रतिनिधीत्व अथवा सल्लामसलत हेतूर्थ अस्तित्वात असलेल्या व्यवस्थेचे तपशिल |
| 8 | कार्यालयाचा भाग म्हणून अथक सल्लामसलतहेतूर्थ नेमलेली दोन किंवा अधिक व्यक्तींचा समावेश असलेली मंडळे,परिषदा समित्या आणि इतर संस्था यांची यादी आणि अशा मंडळ,परिषदा समित्या व इतर यांच्या बैठका जनतेस खुल्या आहेत किंवा अशा बैठकांचे इतिवृत्त जनतेस सुसाध्य असल्यास त्याची यादी |
| 9 | अधिकारी व कर्मचारी यांची नामदर्शिका |
| 10 | नियमांतर्गत प्रत्येक अधिकारी आणि कर्मचारी यांना प्रतिमाह मिळणारे वेतन मोबदल्याच्या पद्धतीसह |
| 11 | सर्व योजना,प्रस्तावित खर्च आणि संस्थांना केलेल्या वाटपाचा अहवाल याचा तपशिल दर्शविणारी अंदाजपत्रकातील तरतूद |
| 12 | द्रव्यसहाय्य,कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची पद्धत वाटपाची रक्कम आणि अशा कार्यक्रमाच्या उपभोक्त्यांचा तपशिल |
| 13 | कार्यालयातर्फे कायदेशीर हक्क,परवाने व सवलती प्राप्तकर्त्याबाबत तपशिल |
| 14 | कार्यालयात उपलब्ध असलेल्या अशा माहितीचे तपशिल जे इलेक्ट्रॉनिक स्वरुपात रुपांतरीत केले आहेत |
| 15 | माहिती प्राप्त करण्यासाठी नागरीकांना उपलब्ध असलेल्या सुविधांचे तपशिल यात जनतेच्या वापरासाठी नागरीकांना उपलब्ध असलेल्या सुविधांचे तपशिल यात जनतेच्या वापरासाठी वाचनालय अथवा ग्रंथालय चालवले जात असेल तर त्याच्या कामकाजाची वेळ अंतर्भूत आहे |
| 16 | सार्वजनिक माहिती अधिकारी यांचे नांव,पदनाम व इतर तपशिल |
| 17 | इतर उपयोगी माहिती |

Scanned with CamScanner

अत्यंत तातडीचे

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.
नागरी सुविधा केंद्र.
क्र.नासुकें/१/कावि/ ०९ /२०१९
दिनांक :- ०५ / ०७/२०१९

माहितीचा अधिकार

विषय :- माहिती अधिकार अधिनियम, २००५
नागरिकांना अवलोकनासाठी अभिलेख उपलब्ध करुन देणेबाबत...

परिपत्रक

शासन परिपत्रक **क्र.संकिर्ण २०१८/प्र.क्र.४५/कार्या-६ दि.२६ नोव्हेंबर २०१८** अन्वये शासकीय कामकाजात अधिक पारदर्शकता येण्यासाठी व माहिती अधिकार अधिनियमांतर्गत प्राप्त माहिती अर्जांची, प्रथम व व्दितीय अपिलीय अर्जांची संख्या कमी होण्याच्या दृष्टीने राज्यातील जिल्हास्तरीय कार्यालयांपासून ते निमस्तरीय सर्व कार्यालयात तसेच महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद इत्यादी सर्व कार्यालयात प्रत्येक सोमवारी किंवा सदर दिवशी सार्वजनिक सुट्टी असल्यास त्यानंतरच्या कार्यालयीन दिवशी दुपारी ३ ते ५ या वेळेत नागरिकांना **माहितीचा अधिकार अधिनियम, २००५** अंतर्गत विहित प्रक्रियेनुसार त्यांच्या मागणीनुसार अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करुन देणेबाबत कळविले आहे.

सबब, या परिपत्रकान्वये सर्व जनमाहिती अधिकारी व विभागप्रमुखांना कळविण्यात येते की, उपरोक्त शासन परिपत्रकान्वये महाराष्ट्र शासनाने विहित केलेल्या दरानुसार नागरिकांना अभिलेख अवलोकनासाठी पहिला तास मोफत व त्यानंतर प्रत्येक पंधरा मिनिटांना किंवा त्याच्या भागाला रुपये ५/- याप्रमाणे प्रत्येक सोमवारी किंवा सदर दिवशी सार्वजनिक सुट्टी असल्यास त्यानंतरच्या कार्यालयीन दिवशी दुपारी ३ ते ५ या वेळेत **माहितीचा अधिकार अधिनियम, २००५** अंतर्गत **कलम ६(१), व कलम ४ ब** नुसार अभिलेखांची पाहणी करण्यास मोबाईल अथवा इतर अत्याधुनिक साधनांचा वापर न करता अभिलेख उपलब्ध करुन द्यावेत. सदर परिपत्रकाची अंमलबजावणी तात्काळ करणेत यावी.

अति.आयुक्त (१),
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

प्रति,

सर्व जनमाहिती अधिकारी / विभागप्रमुख,
---------------------------------- विभाग.

सोबत :- शासनाकडील दि.२६ नोव्हेंबर २०१८ रोजीचे परिपत्रक

Scanned with CamScanner

माहितीचा अधिकार

ISO 9001:2008 Certification प्राप्त महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८
क्र.नासुके/१/कावि/ ३७ /२०१७
दिनांक १२ /०४/२०१७

**विषय :- माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत माहिती अर्ज व अपील अर्ज स्विकारणेबाबत...**

परिपत्रक

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये अपिलार्थी श्री.नितीन शशिकांत यादव यांनी व्दितीय अपील सादर केले आहे. त्यास अनुसरुन दि.२८/११/२०१६ रोजी झालेल्या अपिलाच्या सुनावणीच्या वेळीचा युक्तीवाद व प्रकरणातील कागदपत्रे विचारात घेता, प्रस्तूत प्रकरणांत मा.राज्य माहिती आयुक्त, श्री. रवींद्र जाधव यांनी माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत माहिती अर्ज / प्रथम अपील अर्ज अपूर्ण पदनाम इ. कारणास्तव न नाकारता ते स्विकारुन आवश्यकतेनुसार योग्य त्या अधिकाऱ्याकडे विहित मुदतीत वर्ग करणेबाबत दक्षता घेण्याचे निर्देश पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दिलेले आहेत. सोबत सदर आदेशाची प्रत जोडणेत येत आहे.

सबब या परिपत्रकान्वये सर्व विभागप्रमुख तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांना सूचित करण्यात येत आहे कि, माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत माहिती अर्ज / प्रथम अपील अर्ज अपूर्ण पदनाम इ. कारणास्तव न नाकारता ते स्विकारुन आवश्यकतेनुसार योग्य त्या अधिकाऱ्याकडे विहित मुदतीत वर्ग करणेबाबत दक्षता घ्यावी.

तसेच, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील नियमांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. भविष्यात अधिनियमांतील नियमांचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचेविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करणेत येईल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(दिनेश वाघमारे)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

प्रति,

सर्व विभागप्रमुख / शाखाप्रमुख
------------------- विभाग.
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

२/- प्रस्तुतचे परिपत्रक आपल्या नियंत्रणाखालील संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचे निदर्शनास आणून द्यावे.

सोबत :- आदेश पारित दि. २०/१२/२०१६ ...

Scanned with CamScanner

<u>अत्यंत तातडीचे</u>

माहितीचा अधिकार

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.
नागरी सुविधा केंद्र.
क्र.नासुकें/१/कावि/८६५/२०१९
दिनांक :- ०५/०९/२०१९

**विषय :- माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या अंमलबजावणीबाबत...**

<u>परिपत्रक</u>

जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे (सर्वसाधारण शाखा) यांचेकडील दि.०६/०७/२०१९ रोजीच्या पत्रान्वये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत मा.जिल्हाधिकारी, पुणे यांची नेमणूक करणेत आलेली असून माहिती अधिकार अंतर्गत प्राप्त अर्जांचे अनुषंगाने जनमाहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचेकडून विहित वेळेत निपटारा होत आहे किंवा कसे याबाबत तपासणी करणेत येणार असलेचे कळविले आहे.

तसेच, त्या अनुषंगाने माहिती अधिकार रजिस्टर गोषवारा सहित अद्ययावत करणेत येऊन तसा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास पाठविणेबाबत कळविणेत आले आहे. याव्यतिरिक्त शासनाकडील परिपत्रक क्र.संकिर्ण २०१६/प्र.क्र.(१४०/१६) सहा. दि.०७/०९/२०१६ अन्वये माहिती मागविणाऱ्या अर्जदारांकडून प्राप्त होणाऱ्या अर्जांची वेगळी नोंदवही ठेवणेबाबत यापूर्वीच सूचित करणेत आले होते.

सबब, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व विभागांना या परिपत्रकान्वये सूचित करणेत येते की, उपरोक्त शासन परिपत्रकात माहिती अधिकार नोंदवह्यांचे (माहिती अधिकार अर्जांची व अपील अर्जांची) दिलेल्या नमुन्यांप्रमाणे <u>मासिक अहवालासह</u> नोंदवह्या अद्ययावत ठेवणेत याव्यात. सोबत नमुना सॉफ्ट कॉपी पाठविणेत येत आहे. तसेच, मा.जिल्हाधिकारी, पुणे कार्यालयाकडून माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये प्राप्त अर्जांचे अनुषंगाने जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडून विहित वेळेत निपटारा होत आहे किंवा कसे याबाबत तपासणी करणेत येणार असून सर्व संबंधितांनी प्राप्त अर्जांवर विहित वेळेत कार्यवाही करुन प्रकरणे निरस्त करणेबाबत व दरमहा शासनास पाठवावयाच्या मासिक अहवाल मुदतीत पाठविणेबाबत दक्षता घ्यावी.

(निळकंठ पोमण)
मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी
तथा नोडल अधिकारी, माहिती अधिकार,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

प्रति,

सर्व विभागप्रमुख,

------------------------------------ विभाग,

सोबत :- १) शासनाकडील परिपत्रक
२) नमुना सॉफ्ट कॉपी

Scanned with CamScanner

# माहिती अधिकार प्राप्त अर्जांची नोंदवही

विभागाचे नाव :-

| अ.क्र. | अर्जाचा नोंदणी क्रमांक | अर्जदाराचे नाव व पत्ता | कोणाकडे अर्ज केला आहे | अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | माहिती पुरविण्याची शेवटची तारीख | अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे काय | माहितीचा थोडक्यात तपशील | मागितलेल्या माहितीचे स्वरुप (फॉर्म), प्रती, मागणे / तपासणे / नमुना / इलेक्ट्रॉनिक माहिती | त्रयस्थ पक्षाची माहिती आहे काय | अर्जाचे शुल्क रुपये | अर्जाची विहित फी भरल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| | | | | | | | | | | | |

माहे :-

| माहिती शुल्क कळविल्याचा दिनांक | माहिती शुल्क भरण्याचे स्वरुप व दिनांक | माहिती शुल्क | माहिती शुल्क दिल्यापासून माहिती देण्यासाठी शिल्लक दिवस | माहिती दिल्याचा दिनांक | माहिती कशाने पाठविली की व्यक्तीश: नेली | माहिती कोणत्या स्वरुपात दिली | पृथक्करण माहिती त्रयस्थ पक्षाची माहिती आहे का | माहिती नाकारली काय | कोणत्या कलमाच्या आधारे नाकारली | प्रथम अपील झाले आहे का | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ |
| | | | | | | | | | | | |

# माहिती अधिकार प्राप्त अपील अर्जांची नोंदवही

विभागाचे नाव :-

| अ.क्र. | अपील अर्जाचा नोंदणी क्रमांक | अपील काराचे नाव व पत्ता | अपील अर्ज कोणाकडे केला आहे माहिती अधिकारी / अपीलीय अधिकारी | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | प्रतिवादी याचे नाव व पत्ता | अपीलार्थी दारिद्र्य रेषेखालील आहे काय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

माहे :-

| अपीलाचा थोडक्यात तपशील | अपील अर्जाचे शुल्क कोणत्या स्वरुपात भरले आहे | अपील अर्जाचे विहित शुल्क भरल्याचा दिनांक | कोणत्या जनमाहिती अधिकाऱ्याविरुद्ध अपील केले त्याचा तपशील | अपीलावर निर्णय दिल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| | | | | | |

Scanned with CamScanner

# माहिती अधिकार अर्जांचा मासिक अहवाल

विभागाचे नाव :-

माहे :-

| मागिल महिन्यातील थकीत अर्जांची संख्या | अहवालाच्या महिन्यात प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या | एकुण अर्जांची संख्या | अहवालाच्या महिन्यात निकाली काढलेल्या अर्जांची संख्या | निकाली काढलेल्या अर्जांपैकी | | प्रलंबित अर्जांची संख्या | कोणत्या कलमान्वये माहिती नाकारली | दारिद्र्य रेषेखालील अर्ज | दस्तऐवज रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेल्या अर्जांची संख्या | माहिती नाकरण्यात आलेल्या अर्जांची संख्या | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | | | | | | |

# माहिती अधिकार अर्जांचा मासिक अहवाल

विभागाचे नाव :-

माहे :-

| मागिल महिन्यातील थकीत अपिलांची संख्या | अहवालाच्या महिन्यात प्राप्त झालेल्या अपिलांची संख्या | एकुण अपिलांची संख्या | निकाली अपिलांची संख्या | निकाली काढलेल्या अर्जांपैकी | | प्रलंबित अपिलांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | विनंती मान्य केलेल्या अपिलांची संख्या | नाकारलेल्या अपिलांची संख्या | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

Scanned with CamScanner

## प्रपत्र - अ

## प्रथम अपिलीय अधिकारी

| अ.क्र. | विभागाचे नाव | प्रथम अपिलीय अधिकाऱ्याचे नाव | पदनाम | दूरध्वनी / मोबाईल | ई मेल | नेमून दिलेले कामकाजाचे कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

## प्रपत्र - ब

## जन माहिती अधिकारी

| अ.क्र. | विभागाचे नाव | जन माहिती अधिकाऱ्याचे नाव | पदनाम | दूरध्वनी / मोबाईल | ई मेल | नेमून दिलेले कामकाजाचे कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

## प्रपत्र - क

## माहिती अधिकाराचे काम करणारे विभागातील कर्मचारी

| अ.क्र. | विभागाचे नाव | माहिती अधिकाराचे काम करणाऱ्या विभागातील कर्मचाऱ्याचे नाव | पदनाम | दूरध्वनी / मोबाईल | ई मेल | नेमून दिलेले कामकाजाचे कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

Scanned with CamScanner

वाचले,

१) परिपत्रक क्र.नासुकें/१/कावि/९१/२०२१ दि.१५/०३/२०२१

२) मा.आयुक्त सो यांनी मान्य केलेला दि. ०७ / ०४/२०२१ रोजीचा प्रस्ताव.

(3)

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.
नागरी सुविधा केंद्र.
क्र.नासुकें/१/कावि/११५ /२०२१
दिनांक : ०७ /०४/२०२१

माहितीचा अधिकार

**विषय :- <u>माहिती अधिकार अधिनियम, २००५ मासिक व वार्षिक अहवालाबाबत</u>...**

**<u>आदेश</u>**

सन २००५ पासून **माहितीचा अधिकार अधिनियम,** २००५ कायदा लागू करणेत आलेला आहे. त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व विभागांनी त्यांचे **उपविभागांचा** माहिती अधिकार मासिक **अहवाल एकत्रित करुन** शासनाने दिलेल्या विहित नमुन्यात दरमहा ५ तारखेला दुपारी ३ वाजेपर्यंत नागरी सुविधा केंद्र विभागाकडे पाठविणे आवश्यक आहे. तसेच, वर्षातून एकदा **आपला व आपले उपविभागांचा एकत्रित** वार्षिक अहवाल विहित कालावधीत पाठविणे आवश्यक आहे.

तथापि, माझे असे निदर्शनास आले आहे की, आपलेकडील माहिती अधिकार मासिक व वार्षिक अहवाल विहित वेळेत नागरी सुविधा केंद्र विभागाकडे एकत्रितरित्या पाठविला जात नाही. तसेच, अहवाल पाठविला तरी तो केवळ आपल्या मुख्य कार्यालयाचा पाठविला जातो. त्यामध्ये आपल्या **उपविभागांची माहिती एकत्रित केली जात नाही.** त्यामुळे शासनास दरमहा पाठवावयाची माहिती अपूर्ण पाठविली जात आहे.

सबब, मी, अति.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, या आदेशान्वये संबंधितांना निर्देश देत आहे की, आपल्या मुख्य विभागाचा व आपल्या उपविभागांचा एकत्रित मासिक अहवाल नागरी सुविधा केंद्र विभागाकडे **<u>दरमहा ५ तारखेला दुपारी ३ वाजेपर्यंत</u>** न चुकता पाठविणेत यावा. तसेच, याकामी आपले उपविभागांना आपले स्तरावर परिपत्रक / आदेशाव्दारे सूचना / निर्देश देण्यात येऊन दरमहा २ तारखेपर्यंत अहवाल आपले विभागाकडे मागविणेत यावा व सदर अहवाल एकत्रित करुन विहित वेळेत नागरी सुविधा केंद्र विभागाकडे पाठविणेत यावा.

सदर अहवाल शासनास विहित वेळेत पाठविणे आवश्यक असलेने याकामी विलंब अपेक्षित नाही. तसेच, याकामी टाळाटाळ करणाऱ्या संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांवर नियमाधीन कारवाई प्रस्तावित करणेत येईल याची स्पष्ट नोंद घेणेत यावी.

(सही) १/४/२१

(विकास ढाकणे)
**अति.आयुक्त (१),**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

प्रति,

१) करसंकलन विभाग
२) पाणीपुरवठा विभाग
३) जलनि:सारण विभाग
४) स्थापत्य विभाग
५) विद्युत विभाग
६) वैद्यकीय विभाग
७) शिक्षण विभाग
८) माध्यमिक शिक्षण विभाग
९) आरोग्य विभाग
१०) भूमि आणि जिंदगी विभाग
११) बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग.

Scanned with CamScanner

**अत्यंत तातडीचे**

माहितीचा अधिकार

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.
नागरी सुविधा केंद्र
क्र.नासुकें/१/कावि/ २७६/२०२०
दिनांक : १८/१२/२०२०

विषय :- **माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत नागरिकांना देण्यात येणाऱ्या माहितीबाबत व घेण्यात येणाऱ्या प्रथम अपिलांबाबत...**

## परिपत्रक

सन २००५ पासून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कायदा लागू करणेत आलेला आहे. त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व विभागांमध्ये जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांना पदनिर्देशित करणेत आलेले आहे.

श्री.नितीन शशिकांत यादव,हु संस्थापक / अध्यक्ष, जागृत नागरिक महासंघ यांचेकडील दि.०२/११/२०२० रोजीच्या निवेदनात त्यांनी कोविड-१९ चे पार्श्वभूमिवर मा.उच्च न्यायालयाकडील परिपत्रकानुसार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत घेण्यात येणारी प्रथम अपिले व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे घेण्यात यावीत असे कळविले आहे.

सबब, या परिपत्रकान्वये मनपाच्या सर्व विभागातील प्रथम अपिलीय अधिकारी यांना सूचित करण्यात येते की, सोबत जोडणेत आलेल्या मा.उच्च न्यायालयाकडील परिपत्रकानुसार कोविड-१९ चे पार्श्वभूमिवर माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत प्राप्त झालेल्या प्रथम अपिल अर्जांची सुनावणी ही अर्जदाराला कार्यालयात न बोलावता व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे घेण्यात यावी. तसेच, ज्या अर्जदारांना व्हिडीओ कॉन्फरन्स व्दारे अपिलाची सुनावणी सोईस्कर वाटत नसेल अशा अर्जदारांना कार्यालयात बोलावून सोशल डिस्टन्सींग, मास्कचा वापर अशा शासनाच्या नियमांप्रमाणे सुनावणी घेण्यात यावी. जास्तीत जास्त प्रथम अपिल अर्जांवर व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे अपिल घेण्यात यावेत.

तसेच, श्री.राहूल शिवाजी वडमारे, संस्थापक / अध्यक्ष, भिम संग्राम सामाजिक संघटना यांनी दिलेल्या निवेदनाव्दारे त्यांनी मनपाच्या विविध विभागांना देण्यात येणाऱ्या निवेदनांवर विहित वेळेत कार्यवाही होत नसल्याने माहिती अधिकार अर्जाचा वापर करावा लागत असून त्यातही एक महिना होऊन देण्यात आलेली माहिती खोटी व चुकीची दिली जात आहे व पुन्हा अपिल करण्यासाठी भाग पाडले जात असून त्यात वेळ आणि पैसा दोनही वाया जात असलेबाबत कळविले आहे.

सबब, सर्व विभागांना असेही सूचित करणेत येते की, माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत प्राप्त होणाऱ्या अर्जांवर विहित वेळेत कार्यवाही करणेत यावी. सोबत उपरोक्त संबंधित निवेदने / परिपत्रके जोडणेत आलेली आहेत. यापुढे याबाबत नागरिकांच्या / अर्जदारांच्या कोणत्याही प्रकारच्या तक्रारी प्राप्त होणार नाहीत याची सर्व संबंधितांनी दखल घ्यावी. अन्यथा संबंधितांवर योग्य ती नियमाधीन प्रशासकीय कारवाई करणेत येईल याची सर्व संबंधितांनी स्पष्ट नोंद घ्यावी.

(श्रावण हर्डीकर)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

प्रति,

सर्व विभागप्रमुख / सर्व जनमाहिती अधिकारी / सर्व प्रथम अपिलीय अधिकारी,
------------------------------------------ विभाग,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी.

Scanned with CamScanner

**Instructions to conduct Quasi-judicial administrative hearings and proceedings through Video Conferencing.**

**Government of Maharashtra**
**General Administration Department**
**Government Circular No. Misc 2020 / C. R. 62 / 18 (O & M)**
Madam Cama Road,
Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai – 400 032

Date : 13th October, 2020

## CIRCULAR

In the matter of PIL (L) 3144 of 2020 (Shailesh Gandhi & others V/s State of Maharashtra through its Chief Secretary), before the Bombay High Court the petitioners have, inter-alia, prayed that, in the recent outbreak of COVID-19, it has necessitated the immediate adoption of measures to ensure social distancing. Hence prayed to issue appropriate guidelines or directions to all the public authorities in the State of Maharashtra to adopt an appropriate online video conferencing platform for conducting hearings pertaining to proceedings under the diverse statutes applicable to such public authorities as well as for conducting hearing of First Appeals under the Right to Information Act.

2. The Hon. Court on 26th September, 2020 at the time of hearing the petition considered the statement made by the concerned AGP in this respect on behalf of the State of Maharashtra, that the process of quasi-judicial hearing through Video Conferencing is underway. Further the Hon. High Court directed to apprise it regarding the steps taken by the Government and thereby not leave any room for complaint to be voiced by the petitioner on the returnable date.

3. It is the need of a hour to go for virtual hearings in quasi-judicial matters heard by competent authorities under various statutes, considering pandemic situation so as to maintain social distancing.

4. In view of the above, all the Additional Chief Secretaries/ Principal Secretaries/ Secretaries and Head of the Departments / Public Authorities are

Scanned with CamScanner

hereby instructed to use Video Conferencing for conducting virtual hearings in respect of proceedings under the diverse statutes applicable to such public authorities as well as for conducting hearing of First Appeals under the Right to Information Act. This will facilitate the dispensation of justice speedily without compromising the health and safety of parties in the current times.

5. However in event a party to the proceedings, request for hearing in person due to technical reasons, such as quality of internet access, hardware access etc. in that cases at their end, the parties may be allowed personal hearing by the Competent Authorities.

6. This Government circular is available at the website www.maharashtra.gov.in. Reference no. for this is 202010131433317107. This order has been signed digitally.

By order and in the name of Governor of Maharashtra.

SHRIKANT M DESHPANDE

Digitally signed by SHRIKANT M DESHPANDE
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=ALL INDIA SERVICES DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=[illegible], serialNumber=[illegible], cn=SHRIKANT M DESHPANDE
Date: 2020.10.13 14:37:29 +05'30'

**( Shrikant Deshpande)**
**Principal Secretary (AR & O&M)**
**Government of Maharashtra**

**Copy to,**

1. Secretary to Hon. Governor,
2. Hon. Speaker, Maharashtra Legislative Council, Mumbai,
3. Hon. Chairman, Maharashtra Legislative Assembly, Mumbai,
4. Hon. Leader of Opposition, Maharashtra Legislative Council / Maharashtra Legislative Assembly,
5. Hon. Deputy Speaker, Maharashtra Legislative Council, Mumbai,
6. Hon. Deputy Chairman, Maharashtra Legislative Assembly, Mumbai,
7. All Hon. Members of Parliament / Maharashtra Legislative Council / Maharashtra Legislative Assembly,
8. Principal Secretary to Hon. Chief Minister, Mantralaya, Mumbai 400 032,
9. Secretary to Hon. Deputy Chief Minister, Mantralaya, Mumbai 400 032,
10. Private Secretaries to All Ministers / State Ministers, Mantralaya, Mumbai 400 032,
11. Advocate General, Maharashtra State,



Scanned with CamScanner